# श्री शहाजी छत्रपती यांचे इतिहास लेखन व संशोधनातील योगदान

**प्रा. वसंत ज्ञानदेव ढेरे**
एम.ए., एम.फिल्.
विभागप्रमुख व सहाय्यक प्राध्यापक,
राधानगरी महाविद्यालय, राधानगरी

## <u>प्रस्तावना</u> (Introduction)

महाराष्ट्रातील प्राचीन प्रसिध्द नगरामध्ये कोल्हापूरचा नामउल्लेख आढळतो. महाराणी ताराबाईने इ. स. १७१० मध्ये पन्हाळगडावर स्वतंत्र मराठा राज्याची निर्मिती केल्याने नंतरच्या काळात कोल्हापूर स्वतंत्र मराठा राज्य म्हणून उदयास आले. कोल्हापूरचे स्वतंत्र राज्य निर्माण झाल्यापासून या ठिकाणी स्वतंत्र मराठा छत्रपतींची परंपरा सुरू झाली. छत्रपती शाहू महारांजानी १८९४ ते १९२२ पर्यंत कोल्हापूरचे छत्रपती या नात्याने राज्यकारभार केला. राजर्षी शाहू महाराजांच्या मृत्यूनंतर त्यांचे पुत्र तिसरे राजाराम महाराज (१९२२ ते १९४०) कोल्हापूरच्या गादीवर विराजमान झाले. छत्रपती राजाराम महाराज २६ नोव्हेबंर १९४० रोजी मृत्यू पावले. त्यांना मुलगा नसल्याने कोल्हापूरच्या गादीस वारस नव्हता. गादीच्या वारस प्रश्नावरून दत्तक प्रकरण घडले ते १९४२ पर्यंत चालू होते. चावरेकर घराण्यातील दीड महिन्याचे प्रतापसिंह यांना दत्तक घेऊन पाचवे शिवाजी (१९४२ – १९४३) या नावाने छत्रपतीपदी बसविण्यात आले मात्र अल्पकाळातच त्यांचे निधन झाले. छत्रपती पाचवे शिवाजी यांच्या मृत्यूनंतर देवास संस्थानचे अधिपती तुकोजीराव पवार यांचे पुत्र व राजर्षि शाहू महाराज यांच नातू विक्रमसिंह पवार यांना इ.स. १९४७ मध्ये दत्तक घेण्यात आले व त्यांचे शहाजी छत्रपती (१९४७ –१९८३) असे नामकरण करून कोल्हापूरच्या गादीवर बसवण्यात आले. प्रस्तुत लघु शोध प्रबंधाचे तेच नायक आहेत. शहाजी महाराज गादीवर आल्यानंतर कोल्हापूरमध्ये त्यांनी अनेक सुधारणा केल्या. त्यातील इतिहासलेखनातील त्यांचे कार्य महत्वपूर्ण असे आहे.

## <u>विषयाची निवड</u> (Selection of Topic)

प्राचीन काळापासून अनेक राज्यकर्त्यांनी इतिहास लेखनाला चालना दिली आहे. मात्र इतिहास हा जेत्याच्या बाजूने लिहिला गेला ही वस्तुस्थिती असतानाही कोल्हापूरचे शेवटचे छत्रपती शहाजी महाराज यांनी अनेक दप्तरांचा धांडोळा घेवून कागदपत्रे जमवून इतिहासातील तज्ञांना एकत्र घेवून इतिहासावर साधक – बाधक चर्चा घडवून आणल्या व अनेक जूनी मोडी कागदपत्रे मोडी जाणकारांच्या कडून मराठीत रूपातंरीत करून घेतली व त्या अधारे इतिहास संदर्भ साधनांमध्ये भर घातली.

प्रस्तुत संशोधकास मराठयांच्या इतिहासाविषयी उत्सुकता आहे. याच जिज्ञासेपोटी प्रस्तुत संशोधक कोल्हापूरच्या राजकीय जीवनावर अभ्यास करत असताना असे लक्षात आले की, कोल्हापूरच्या छत्रपती पैकी शेवटचे बारावे छत्रपती शहाजी छत्रपती यांनी कोल्हापूर संस्थान विलिनीकरणानंतर कोल्हापूरात अनेक लोकोपयोगी उपक्रम राबविले. तसेच इतिहास संशोधनास विशेष चालना व प्रोत्साहनही दिले. त्याचबद्दल कुतुहल वाटल्याने प्रस्तुत संशोधकाने ''**श्री शहाजी छत्रपती यांचे इतिहासलेखन व संशोधनातील योगदान**'' या विषयाची निवड केलेली आहे.

## विषयाचे महत्व, स्वरूप व व्याप्ती (Importance of Subject, Nature and Scope)

स्वातंत्र्यपूर्व काळात भारतातील अनेक संस्थानिक वेगवेगळया कारणांनी चर्चेचा विषय बनलेले होते. मात्र भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर सर्व संस्थाने विलिन झाली. परिणामी संस्थानिकांचे महत्व नाहीसे झाले. त्यांची दखल घेण्याची गरज उरली नाही. परंतु व्यक्तीशः ज्या संस्थानिकांनी संस्मरणीय कामगिरी केली त्यांच्या बहुमोल कामगिरीचे आता खुलेपणाने व पूर्वग्रहरहित मूल्यमापन व्हावयास हवे. कारण ज्या विवेकी व सुबध्द संस्थानिकांनी सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात कामगिरी केली, आपल्या कारकिर्दीत विविध प्रयोग आणि प्रयत्न केले अशा प्रागतिक संस्थानिकांच्या कार्याच्या खुणा त्या त्या काळाच्या संदर्भात शोधता येतील. स्वतंत्र भारताच्या लोकशाही व्यवस्था आणि राजकारणातील नव संस्थानिकांच्या कार्याची तुलनाही करून पहाता येईल.

शहाजी छत्रपती महाराजांनी राबविलेल्या विविध उपक्रमांचा अभ्यास प्रस्तुत लघुशोधप्रबंणामध्ये कला जाणार आहे. यामध्ये शहाजी महाराजांनी स्थापन केलेले शहाजी छत्रपती वस्तुसंग्रहालय, न्यू पॅलेस परिसरातील प्राणी संग्रहालय, ग्रंथालयाचे पुनरूज्जीवन आणि मराठयांच्या इतिहास लेखनातील त्यांचा दृष्टिकोन तसेच बहुमोल सक्रिय सहकार्य आणि प्रोत्साहन यांचा आढावा घेण्यात येणार आहे.

शहाजी छत्रपतींना शालेय जीवनापासून इतिहासाविषयी विशेषतः मराठयांच्या इतिहासाविषयी आवड होती. या आवडीतूनच त्यांना इंदार ख्रिश्चन महाविद्यालयामध्ये इतिहास या विषयात प्रथम पारितोषिक प्राप्त झालेले होते. नंतर पदवी शिक्षणासाठी ते कोल्हापूर मधील राजाराम महाविद्यालयात दाखल झाले. त्यावेळी त्यांनी पदवीसाठी इतिहास, राज्यशास्त्र व अर्थशास्त्र हे विषय निवडलेले होते.

छत्रपती शहाजी महाराज यांचे इतिहासातील दुर्मिळ कागदपत्राचे प्रकाशन आणि इतिहासलेखन यासंबधी केलेले कार्य व त्यांनी दिलेले प्रोत्साहन चिरस्मरणीय आहे. शहाजी छत्रपती अशा काही मोजक्या संस्थानिकांपैकी एक आहेत की, ज्यांनी आपल्या हाती राहिलेली साधन सपत्ती समाजातील एक उपेक्षित अशा मराठयांचा इतिहास विशेषतः करवीर व देवास (थोरली पाती) राज्याचा इतिहास विषयाच्या अभ्युदयासाठी खर्च केली. शहाजी महाराजांनी स्वतःचा वेळ, प्रतिष्ठा व पैसा खर्च करून विवेक बुध्दीने इतिहास संशोधन व लेखनास प्रोत्साहन देऊन अनेक इतिहास ग्रंथ व दुर्मिळ कागदपत्रे प्रकाशित केली.

देवास संस्थानचा कारभार हाती घेतल्यानंतर विक्रमसिंहराव उर्फ शहाजी छत्रपती यांनी विविध घराण्यातील दुर्मिळ दस्तऐवज त्या–त्या घराण्यातील वारसांना बोलावून जमा केले. रियासतकार गो. स. सरदेसाई यांच्या मार्गदर्शनाखाली इतिहास लेखनात तरबेज झालेले मा. वि. गुजर यांना निमंत्रित करून त्यांच्याकडून 'देवास संस्थान थोरली पाती पवार घराण्याचा इतिहास' हा ग्रंथ लिहून प्रकाशित केला. त्यानंतर 'देवास थोरली पाती पवार घराण्याच्या इतिहासाची साधने', 'पवार विश्वासराव घराण्याच्या ऐतिहासिक कागदसंग्रह', 'सेनासप्तसहस्त्री पवार विजय', 'विश्वासराव प्रशस्ती', 'गणेगांवकर पवार घरण्याची ऐतिहासिक बखर' इत्यादी ग्रंथ प्रकाशित केले.

कोल्हापूरचे बारावे छत्रपती म्हणून गादीवर आल्यानंतर शहाजी महाराजांनी घाटगे, जाधव, घोरपडे, राजाज्ञा, गायकवाड, प्रतिनिधी, अमात्य इत्यादीच्या वारसदारांकडून जूनी दप्तरे व कागदपत्रे मिळवली. त्यासाठी ते स्वतः कापशी, निपाणी या ठिकाणी गेले. ही कागदपत्रे जमा करण्याच्या कामागिरीवर त्यांनी इतिहासाचे ज्ञान असणारे कर्मचारी नेमले. त्यांच्याकडून नविन राजवाडयाच्या परिसरातील विविध ठिकाणी विखूरलेली दप्तरे एकत्र केली आणि कोल्हापूर राज्याचा इतिहास

लिहून घेण्यासाठी प्रयत्नशील राहिले. कोल्हापूरचा इतिहास मा. वि. गुजर यांनी लिहावा अशी त्यांची इच्छा होती. मात्र प्रकृती अस्वास्थ व दृष्टिमांद्यता या कारणामुळे मा. वि. गुजर यानी असमर्थता व्यक्त केली. त्यानंतर हे काम प्रसिध्द इंग्रजी लेखक मनोहर माळगांवकर, स. मा. गर्गे, कापशीच्या जहागिरीचे दिवाण शं. ह. वर्टीकर, खंडेराव गायकवाड, रत्नाकरपंत राजाज्ञे, यशवंतराव तरस्ते यांच्याकडून करून घेतले.

छत्रपती शहाजी राजे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे सात लोकांचे अनौपचारिक **इतिहास मंडळ** अस्तित्वात आले. या मंडळाचा कार्यक्रम पुढील प्रमाणे असे. साधारणतः मंडळातील सर्व सभासद आवश्यक ते ग्रंथ, संदर्भ साधने, कागदपत्रे इत्यादीचा शोध घेवून त्यांची आवश्यक टिप्पणे महिनाभर काढीत. दर पंधरा दिवसांनी राधानगरी येथील 'शिवाजी व्हीला' कॅम्पच्या ठिकाणी चर्चा होत असे. या चर्चेसाठी अनेक इतिहासप्रेमी व अभ्यासक अधून मधून येत किंवा गरज वाटेल तेंव्हा त्यांना बोलावून घेतले जाई. यामध्ये भालजी पेंढारकर, जनरल एस. पी. पी. थोरात, राजपूत इतिहासावरील अधिकारी व्यक्ती डॉ. रघुवीरसिंग, डॉ. ॲड्रियन मेयर, अमेरिकन विद्यापीठात इतिहास शिकवणारे डॉ. राव, कर्नल दिनकर केरकर, श्री चंद्रसेन मतकर, श्री. पी. व्ही. सांळुखे इत्यादीचा समावेश होता. या सर्व मंडळीची (इतिहास मंडळ) राधानगरी येथील 'शिवाजी व्हीला' येथे बैठक व चर्चा होत असे. त्यामधून कोल्हापूरचा सुसंगत इतिहास तयार होण्यास मदत झाली.

## <u>अभ्यासाची उद्‌दिष्टे</u> (Objectives of the Study)

प्रस्तुत संशाधकाने "**कोल्हापूरचे श्री शहाजी छत्रपती यांचे इतिहासातील योगदान**" हा अभ्यास विषय निवडला आहे. त्याची उद्‌दिष्टे खालील प्रमाणे आहेत.

१. शहाजी छत्रपती यांनी देवास, इंदोर व कोल्हापूर यथे इतिहासाच्या प्रेमापोटी राबविलेल्या उपक्रमाचा आढावा घेणे.
२. शहाजी छत्रपतीनी निर्माण केलेल्या इतिहास मंडळाने केलेल्या संशोधन, लेखनाचा चिकित्सक आढावा घेणे.
३. शहाजी छत्रपतीनी स्थापन केलेल्या संग्रहालयाचा व इतर उपक्रमांचा आढावा घेऊन त्यांच्या इतिहासाविषयी प्रेमाची दखल घेणे.
४. कोल्हापूर संस्थान विलीनीकरणानंतरच्या त्यांच्या कार्याचा आढाावा घेणे.
५. प्रस्तूत उपक्रमासाठी अप्रकाशित कागदपत्रांचा शोध घेऊन त्याचा लिखाणामध्ये वापर करणे.

## <u>गृहितके</u> (Hypothesis)

प्रस्तुत संशोधनाकरीता निवडलेल्या समस्येकरीता संशोधकाने खालील गृहीतके मनाशी धरली आहेत.

१) शहाजी छत्रपती यांचे मराठयांच्या इतिहासावर नितांत प्रेम होते.

२) शहाजी छत्रपती यांनी इतिहास मंडळावर जाणकार, अभ्यासू लोकांची नेमणूक केली.

३) शहाजी छत्रपती वस्तुसंग्रहालयाच्या माध्यमात्न व इतर उपक्रमातून कोल्हापूरचा समृध्द वारसा जीवंत ठेवला.

४) वस्तुसंग्रहालयाच्या उभारणीतून त्यांनी जनतेत इतिहास प्रेम निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

५) इतिहास लेखनाची साधने बंदिस्त न ठेवता ती इतिहास अभ्यासकांना संशोधन लेखन यासाठी खुली केली.

## संशोधन पध्दती (Research Methodology)

संशोधन विषयाचा अभ्यास करताना प्रस्तुत संशाधकाने ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा वापर केला आहे. उपलब्ध माहिती ही अंतर्गत व बर्हिगत परीक्षणाद्वारे तपासून त्याचा संशोधना करिता वापर केला आहे. विषयाची मांडणी करोत असताना प्राथमिक व दुय्यम साधनांचा अधार घेऊन वस्तुनिष्ठ लिखाणाचा प्रयत्न केलेला आहे.

कागदपत्रांचा अभ्यास करत असताना पूर्वगृहदूषित दृष्टिकोन न ठेवता तटस्थपणे विषयाची मांडणी केली आहे. वरील सर्व बाबींचा विचार करता प्रस्तुत संशाधकाचे संशोधन हे इतर अभ्यासकांना उपयुक्त व मार्गदर्शक ठरेल. त्यामुळे एक इतिहास अभ्यासक व संशोधक या नात्याने शहाजी छत्रपतीच्या संपूर्ण कारकीर्दीचा आढावा घेणे प्रस्तुत संशोधकास आवश्यक वाटते.

## लघुशोधप्रकल्पाचे आधार (संदर्भ साधने) (Available Source Material )

महाराष्ट्र राज्य गॅझेटियर : कोल्हापूर जिल्हा, करवीर रियासत, करवीर रियसातीची कागदपत्रे खंड एक ते चार, एक्स्कॅव्हेशन ॲट ब्रम्हपुरी (रिपोर्ट), कोल्हापूर प्रातांचा इतिहास भाग एक व दोन, कोल्हापूर दर्शन, कोल्हापूर छत्रपती घराण्याच्या इतिहासाची साधने खंड १ ते ८, संस्थान देवास थोरली पाती पवार घराण्याचा इतिहास, Paurs & Dewas Senior, याशिवाय प्रस्तुत संशोधनासाठी व लिखाणासाठी कोल्हापूर पुराभिलेखागार, मुंबई पुराभिलेखागार, वैयक्तिक पत्रे, वृत्तपत्रीय संदर्भ, रोजनिशी, शासकीय ऑफिस कागदपत्रे, समकालीन व्यक्तींच्या मुलाखती इत्यादी संदर्भ साधनांचा उपयोग प्रस्तुत लिखाणासाठी केलेला आहे.

## प्रकरण रचना (Chapter scheme)

प्रस्तुत संशोधन करत असताना त्याची खालील प्रकरणामध्ये त्याची विभागणी केली आहे.

१. प्रकरण पहिले : प्रस्तावना

२. प्रकरण दुसरे : शहाजी छत्रपतीची इतिहासप्रेमाची पूर्वपीठिका

३. प्रकरण तिसरे : शहाजी छत्रपतीचे देवास संस्थानातील इतिहास संशोधनातील कार्य

४. प्रकरण चौथे : शहाजी छत्रपतीचे कोल्हापूर संस्थानातील इतिहास लेखनातील कामगिरी

५. प्रकरण पाचवे : वस्तसंग्रहालय व प्राणीसंग्रहालयाची स्थापना व विकास

६. मुल्यमापन.

## शहाजी छत्रपतीनी प्रकशित केलेले ग्रंथ व कागदपत्रे

शहाजी छत्रपती यांनी स्थापन केलेल्या इतिहास मंडळानं एकूण तीस खंड संपादित केले. हे सगळेच्या सगळे महाराजांनी स्वखर्चाने प्रसिध्द केले होते.

**साधन – इतिहास ग्रंथ : देवास – (थोरली पाती)**

१) संस्थान देवास थोरली पाती, पवार घराण्याचा इतिहास – मा. वि. गुजर.
२) संस्थान देवास थोरली पाती, पवार घराण्याच्या इतिहासाची साधने – (संपा.) मा. वि. गुजर.
३) विश्वासराव प्रशस्ती व सेनासप्तसहस्त्री पवार विजय – (संपा.) कृ. ग. कौचाळे.
४) पवार विश्वासराव घराण्याचा इतिहास आणि ऐतिहासिक कागद संग्रह – (संपा.) मा. वि. गुजर.
५) संस्थान देवास थोरली पाती गणेगांव पवार घराण्याची बखर – (संपा.) र. कृ. अत्रे.
६) Paurs of Dewas Senior – L Col. Manohar Malgonkar.

**इतिहास साधन ग्रंथ – (कोल्हापूर राज्य.)**

१) करवीर रियासत – स. मा. गर्गे.
२) राव विश्वासराव गायकवाड घराण्याचा इतिहास – ख. आ. गायकवाड.
३) हिम्मतबहाद्दर चव्हाण घराण्याचा इतिहास – वासुदेवशास्त्री खरे.
४) कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याचा इतिहास – स. मा. गर्गे. आणि शं. ह. वर्टोकर.
५) करवीरचे राजाज्ञा घराणे – स. मा. गर्गे.
६) करवीर रियासतीची कागदपत्रे : खंड एक – (निवडी, तोरगल, हुजर खाजगी, राव विश्वासराव गायकवाड इ. दप्तरे) – (संपा.) स. मा. गर्गे.
७) करवीर रियासतीची कागदपत्रे : खंड दोन – (चिटणीस, पारसनिसी, सरलष्कर, निबांळकर, चावरेकर, निपाणकर इत्यादी दप्तरे) (संपा.) स. मा. गर्गे.
८) करवीर रियासतीची कागदपत्रे : खंड तीन – (कागल (ज्यु.), पंतप्रतिनिधी इत्यादी दप्तरे) (संपा) स. मा. गर्गे.
९) करवीर रियासतीची कागदपत्रे : खंड चार – (पणजी येथील गोवा दप्तराती मोडी कागदपत्रे) (संपा) स. मा. गर्गे.
१०) कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याची कागदपत्रे – (संपा) श. ह. वर्टीकर.
११) करवीर सरादारांच्या कैफियती – (संपा.) कृ. ना. गायकवाड.
१२) करवीरचे छत्रपती आणि पोर्तगीज (गोवा पुराभिलेख संग्रहालयातील निवडलेले कागद)–(संपा.) प्रा. स. शं. देसाई.
१३) कोल्हापूर – पोतुर्गीज सबंध, (गोवा पुराभिलेख संग्रहालयातील निवडलेले कागद) – (संपा.) डॉ. प्र. पां. शिरोडकर.

१४) कोल्हापूर छत्रपती घराण्याची इतिहासाची साधने : खंड एक व दोन, (इ. स. १७०० ते १७६०) – (संपा.) मा. वि. गुजर.
१५) कोल्हापूर छत्रपती घराण्याची इतिहासाची साधने : खंड तीन व चार ( इ. स. १७६१ ते १८४४) – (संपा.) मा. वि. गुजर.
१६) कोल्हापूर छत्रपती घराण्याची इतिहासाची साधने : खंड पाच, सहा व सात ( इ. स. १८१३ ते १८७८) – (संपा.) मा. वि. गुजर.
१७) कोल्हापूर छत्रपती घराण्याची इतिहासाची साधने : खंड आठ ( गोवा दप्तर) – (संपा.) मा. वि. गुजर.
१८) Chhatrapatis of Kolhapur – L Col. Manohar Malgaonkar.